IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 2, October 2024

# जैन तत्त्वज्ञानातील लोकशाही

**डॉ. हर्षवर्धन प्रतिभाताई शंकर यादव**

सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग, दत्त द्वारका महाविद्यालय, वाकरे, जि. कोल्हापूर

harshavardhanyadav11@gmail.com

लोकशाही ही 'जनतेचे, जनतेद्वारा आणि जनतेसाठी चालवली जाणारी शासनव्यवस्था आहे.'ही अशी शासन प्रणालीआहे ज्यामध्ये,'कायद्याच्या दृष्टीने राज्यसंस्थेची नियमन करणारी सत्ता विशिष्ट वर्ग वा वर्गांच्या हातात असत नाही, तर ती समाजातील सर्व सदस्यांमध्ये निहित असते.' याचा अर्थ लोकशाही व्यवस्थेत सर्वसामान्यांच्या हातात सत्तेचा अंतिम स्रोत असतो.

'लोकशाही' या व्यवस्थेचा उदय आणि विकास मुख्यतः ख्रिस्तपूर्व चौथ्या-पाचव्या शतकात पाश्चात्य जगात झाला.तिथे झालेल्या विविध चळवळींच्या परिणामस्वरुपात लोकशाहीच्या विविध सिद्धांतांची निर्मिती झाली. असे म्हणतात, "पूर्वेकडील देशांमध्ये ही प्रणाली पश्चिमेकडून आयात केली गेली आहे"; परंतु पूर्वेकडील देशांतील विशेषत: प्राचीन भारतातील धर्मग्रंथ, साहित्य आणि धार्मिक चळवळींचा अभ्यास केल्यास 'आयात केली गेली'हे गृहितक फारसे योग्य वाटत नाही. येथे विकसित झालेल्या विविध धर्मांची तत्त्वे आणि त्यांच्या शिकवणीतून लोकशाही जीवनमूल्ये, प्रक्रिया आणि आदर्श यांचे एकात्मीकरण दिसून येते.

इसवी सनाच्या सहाव्या शतकात भारतात विकसित झालेला जैन धर्म हा त्या धार्मिक व सामाजिक चळवळींपैकी एक आहे. जैन धर्माचे अनुयायी आपला धर्म अनादि मानतात, परंतु वेद, उपनिषदे, श्रीमद् भागवत्, उत्तराध्ययन सूत्र, आचारंग सूत्र, कल्पसूत्र, जैन आगम इत्यादी विविध ऐतिहासिक ग्रंथ आणि जैन साहित्यानुसार जैन धर्माचा उदय वैदिक ब्राह्मण धर्मातील यज्ञ कर्मकांड विरुद्धच्या धार्मिक सुधारणा संदर्भात झाला. या धर्माचे पहिले तीर्थंकर, ज्याला 'निर्ग्रंथ' (प्रापंचिक आसक्ती आणि मायेच्या बंधनांपासून मुक्त लोकांचा पंथ) म्हणून ओळखले जाते, ते जंबूद्वीपचे सम्राट ऋषभदेव होते. 23 वे तीर्थंकर पार्श्वनाथ हे वाराणसीचे राजे अश्वसेनाचे पुत्र होते. जैकोबीने पार्श्वनाथांना जैन धर्माचे खरे संस्थापक मानले आहे, परंतु वैदिक आणि जैन पौराणिक साहित्यातील ऋषभदेवांचा उल्लेख जैन धर्माच्या प्राचीनतेसंबंधी निःसंदिग्धता स्पष्ट करतो. जैन धर्माला अधिक लोकप्रिय बनवण्याचे आणि त्याची तत्त्वे लोकांपर्यंत पोहोचवण्याचे श्रेय जैन धर्माचे 24 वे तीर्थंकर वर्धमान महावीर स्वामी यांना जाते. महावीर स्वामींचे व्यक्तिमत्त्व आणि त्यांच्या शिकवणीचा विविध वर्गातील लोकांच्या मनावर अमिट प्रभाव पडला. त्यांनी सामान्य लोकांना मुक्तीचे म्हणजे आध्यात्मिक सुख मिळवण्याचे ध्येय तर दाखवलेच पण ते साध्य करण्याचे प्रभावी साधनही दाखवले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अंतर्भूत असलेली ध्येयाप्रती सहिष्णुता आणि दृढनिश्चय पाहून त्यांना 'जिन' (विजेता) ही उपाधी देण्यात आली. याच जिनांपासून निर्ग्रंथ संप्रदाय जैन संप्रदाय बनला. जैन तोच आहे, ज्याने प्रेम-द्वेष, सुख-दुःख, आसक्ती-तिरस्कार यांवर विजय मिळवला आणि ज्ञान, धारणा, सत्य आणि क्षमता यांच्या बळावर आपल्या आत्म्याला सांसारिक क्रियांपासून मुक्त केले. हे स्पष्ट आहे की, जैन धर्म केवळ सांसारिक आसक्ती, माया आणि बंधनांपासून मुक्तीचा मार्ग दाखवत नाही तर जीवन व्यवस्थित, सुखी आणि समृद्ध बनविण्यासाठी असलेली आपली उपयुक्तता स्पष्ट करतो. जैन धर्माच्या तत्त्वज्ञानामध्ये आणि शिकवणींमध्ये लोकशाही जीवनमूल्ये आणि तत्त्वे पुढील स्वरूपात समाविष्ट आहेत -

- समानता

महावीरांचे पहिले तत्व समानता हे होते. प्रत्येक प्राणी समान आहे. सर्व प्राणिमात्रांमध्ये समानतेची भावना असल्याशिवाय अहिंसा पूर्णपणे यशस्वी होऊ शकत नाही. प्रजासत्ताकाच्या अपयशाचे मूळही असमानता आहे. ज्या राज्यामध्ये सर्व नागरिकांना समान अधिकार मिळत नाहीत ते राज्य यशस्वी होऊ शकत नाही. म्हणून 'प्रत्येक नागरिक समान आहे' हे लोकशाहीचे मूळ तत्व आहे. जात, रंग, पंथ हे कोणतेही अडथळे त्यास नाहीत. प्रत्येक व्यक्तीला शिक्षण, वैद्यकीय सेवा आणि रोजगाराचा समान अधिकार असणे, हालोकशाहीचा प्राण आहे.

- आर्थिक समानता

जैन तत्त्वज्ञानातील अस्तेय आणि अपरिग्रह ही तत्त्वे आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात. अस्तेय म्हणजे चोरी न करणे आणि अपरिग्रह म्हणजे आवश्यकतेपेक्षा जास्त वस्तू आणि पैसा जमा न करणे. यामध्ये केवळ जमा करणेच नाही तर तृष्णा न करणे देखील समाविष्ट आहे; कारण लालसा चोरी, अप्रामाणिकपणा, हिंसा, खोटे बोलणे यांसारख्या वाईट गोष्टींना जन्म देते. त्यामुळे समाज शोषणाला बळी पडतो. प्रत्येक व्यक्तीने अस्तेय आणि अपरिग्रहाचे पालन केले, ठराविक प्रमाणापेक्षा जास्त उपभोग न करण्याचे व्रत घेतले, 'देशविरति' (कोणत्याही क्षेत्रातएका मर्यादेपलीकडे जाणार नाही) चे व्रत घेतले तर आज आर्थिक समृद्धीसाठी होणारा संघर्ष कमी होईल. तसेच, मालमत्तेच्या केंद्रीकरणाऐवजी उत्पन्नाची समानता देखील आपोआप प्रस्थापित होऊ शकेल. जैन धर्मात सांगितलेले चतुर्विध दान (आहार, अभय, भैषज्य, शास्त्र दान) देखील समाजातील दारिद्र्य आणि शोषण दूर करण्यासाठी उपयुक्त आहे. त्यानुसार प्रत्येकाने भुकेल्यांना अन्न, आजारी लोकांना औषध, अज्ञानांना शिक्षण दिले पाहिजेआणि गोरगरिबांना भूक, वस्त्र व निवारा यांच्या चिंतेतून मुक्त केले पाहिजे, म्हणजेच त्यांना अभयदान दिले पाहिजे. आजच्या युगात, हे चतुर्विध दान अशा तरुणांना,ज्यांच्या जीवनाच्या सुरुवातीलाच भौतिक गरजांची पूर्तता झाल्यानंतर जीवनात निरर्थकता अनुभवास येत आहे, ज्याला संशोधकांनी'क्वार्टर लाइफ क्रायसिस' असे नाव दिले आहे; त्यांना प्रेयमार्ग (क्षणिक आनंद) पासून श्रेय मार्ग (वास्तविक आनंद) पर्यंत घेऊन जात गळेकापू स्पर्धा कमी करण्यास मदत करेल. तेव्हा हे स्पष्ट होते की, आर्थिक लोकशाही साध्य करण्यासाठी जैन धर्माची तत्त्वे पूर्णपणे समर्पक आहेत.

- सामाजिक समानता

समानता हे लोकशाहीचे महत्त्वाचे तत्त्व आहे. यानुसार समाजजीवनात जात, धर्म, रंग, लिंग या आधारावर व्यक्तींमध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता व्यक्तीला त्याच्या वैयक्तिक गुणांच्या आधारे महत्त्व दिले पाहिजे. सामाजिक समानतेची संकल्पना जैन तत्त्वज्ञानात पूर्णरित्या दिसून येते. जैन धर्म हा एक असा धर्म आहे ज्याचे दरवाजे समाजातील प्रत्येक घटकासाठी खुले आहेत.सामाजिक समानतेचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे लिंगभेद दूर करून स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करणे. जैन धर्माने याक्षेत्रात आदर्श ठेवलाआहे. जैन धर्माची शिकवण स्त्री आणि पुरुष दोघांसाठी आहे. धर्मग्रंथांचा अभ्यास, धार्मिक विधी पार पाडणे, व्रतवैकल्ये, साधू जीवनात प्रवेश इत्यादी धार्मिक जीवनातील विविध क्षेत्रे स्त्री आणि पुरुष दोघांसाठी आहेत. भगवान महावीरांनी सांगितलेल्या धार्मिक व्यवस्थेत गृहस्थ पुरुषांना श्रावक आणि गृहस्त स्त्रियांना श्राविका म्हणतात. गृहस्थांप्रमाणे साधू जीवन जगणाऱ्या पुरुषांना साधू आणि स्त्रियांना साध्वी म्हणतात. जैन धर्माने दिलेल्या या संधींचा पुरेपूर वापर महिलांनीकेला. असे म्हणतात की महावीर स्वामींच्या धार्मिक व्यवस्थेत सुमारे 14,000 साधू व 36,000 साध्वी होत्या आणि 1,00,000 श्रावक व 3,00,000 श्राविका होत्या, म्हणजेच जैन धर्माच्या साधू आणि गृहस्थ या दोन्ही जीवनातमहिला अनुयायांची संख्या पुरुषांपेक्षा जास्त होती.धार्मिक जीवनात स्त्री-पुरुषांना मिळणाऱ्या समान संधींचा सामाजिक जीवनाच्या इतर क्षेत्रांवरही परिणाम झाला. शिक्षण क्षेत्रातही स्त्री-पुरुषांना समान संधी होती. जैन परंपरेनुसार, महिलांनी 64 कला शिकणे अपेक्षित होते, त्यापैकी नृत्य, संगीत, चित्रकला, सौंदर्यशास्त्र, वैद्यकशास्त्र आणि गृहशास्त्र या मुख्य कला होत्या.

- स्वातंत्र्य

जैन तत्त्वज्ञानानुसार प्रत्येक पदार्थाचे अस्तित्व स्वतंत्र असून कोणीही कोणाच्या अस्तित्वास अडथळा बनू नये. ज्याप्रमाणे प्रत्येक पदार्थाला त्याच्या मूलभूत गुणधर्मांमुळे स्वतःचे वेगळेपण असते, त्याचप्रमाणे प्रत्येक व्यक्तीला स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडवण्याचे स्वातंत्र्य असते. तो स्वत:च्या प्रयत्नाद्वारे विकसित होण्यास मोकळा असतो. व्यक्ती स्वतः त्याच्या नशिबाचा निर्माता आहे. कोणताही देव किंवा ब्रह्मा त्याचे भाग्य लिहित नाही. माणसाचे आजचे प्रयत्न त्याचे उद्याचे नशीब बनते. सुख आणि दु:ख हे दोन्ही आत्मकृत आहेत. हे कोणत्याही देवाने किंवा इतर शक्तीने निर्माण केलेले नाही. महावीर म्हणतात की, "आत्मा हाच सुख-दु:खाचे कारण आहे आणि आत्माच मित्र व शत्रू आहे. परंतु एखाद्या व्यक्तीला स्वतःला काय बनायचे आहे, मित्र व्हायचे आहे किंवा शत्रू व्हायचे आहे, कर्माने बद्ध व्हायचे आहे की मुक्त व्हायचे आहे, हे ठरवण्याचा अधिकार त्याचा स्वतःचा आहे. लोकशाहीसाठी हे अत्यंत महत्त्वाचे तत्त्व आहे, कारण जिथे माणसाला स्वयंनिर्णयाचा अधिकार नाही, तिथे त्याचे कर्तृत्व कुंठीत होते. नवनिर्मितीसाठी स्वातंत्र्याचा अधिकार आवश्यक आहे. सर्वांना संधी व मतदानाचा समान अधिकार असणे हे लोकशाहीचे अद्वितीय मूल्य आहेत.अशाप्रकारे लोकशाही हा वर्धमान महावीर यांच्या वाणीचा व्यावहारिक उपयोग आहे.

- सहअस्तित्व

अनेकान्तच्या मते, प्रत्येक गोष्टीत धर्माच्या अनंत विपरीत जोड्या असतात आणि ते सहअस्तित्वात असतात. अस्तित्त्व आणि नास्तित्व, नित्यत्व आणि अनित्यत्व एकाच पदार्थात एकाच वेळी अस्तित्वात असते. 'जे अस्तित्वात आहे त्याचा प्रतिपक्ष ही आहे' हे जैन न्यायाचेतत्त्व, लोकशाहीचे आधारभूत सूत्र आहे. लोकशाही ही एक शासनप्रणाली आहे, ज्यामध्ये बहुमत असलेला पक्ष सत्तेच्या सिंहासनावर बसतो आणि जो पक्ष अल्पसंख्याक आहे तो विरोधी पक्षाच्या खुर्चीवर बसतो. जर विरोध नसेल तर पुन्हा निरंकुश राजवट येण्याची शक्यता निर्माण होते. त्यामुळे जिथे सुदृढ पक्ष आणि सुदृढ विरोधक असतात तिथे सुदृढ लोकशाहीची संकल्पना शक्य असते. त्यामुळे असे म्हणता येईल की, अनेकान्तचा पक्ष-प्रतिपक्षाचा सहअस्तित्व सिद्धांत लोकशाहीचे मर्म आहे.

- सहिष्णुता

व्यवहारात लोकशाहीच्या विविध स्वरूपांची प्राप्ती ही सहिष्णुता आधारित जीवनपद्धतीवर अवलंबून असते, म्हणजेच लोकशाहीमध्ये एक विशेष प्रकारच्या मानसिक वृत्तीची अपेक्षा असते, ज्यामध्ये आपण आपल्या स्वतःच्या दृष्टिकोनाचा तसेच दुसऱ्याच्या विरोधी दृष्टिकोनाचाही आदर करतो.जैन धर्माचे अनेकान्तवादी तत्त्वज्ञान या सहिष्णुतेवर भर देते. हे तत्त्वज्ञान मतांच्या विविधतेचे महत्त्व स्वीकारते आणि प्रतिपादन करते की, कोणत्याही विचार किंवा कृतीशी संबंधित कोणताही दृष्टिकोन पूर्णतेचा दावा करू शकत नाही. सत्याची कल्पना देखील एक नसून ती अनेकवचनी आहे, ती सापेक्ष आहे, म्हणून कोणीही आपली मते इतरांवर लादू नये आणि प्रत्येकाने इतरांच्या विचारांचा आदर केला पाहिजे. यामुळे विविध विरोधी विचार, विधाने, व्यवस्था आणि पंथांमध्ये सुसंवाद प्रस्थापित होण्यास आधार प्राप्त होतो.

- बंधुता व अहिंसा

लोकशाही व्यापक स्वरूपात, वैश्विक बंधुता व शांततेच्या कल्पनांवर जोर देते आणि विविध मानव, संस्कृती व राज्यांच्या शांततापूर्ण सहअस्तित्वाच्या आधारावर संघर्ष संपवून जागतिक शांतता व कल्याणाचे उद्दिष्ट ठेवते. जैन धर्मात अंतर्भूत असलेली अहिंसेची कल्पना शांततापूर्ण सहजीवनावर आधारित आहे, जी केवळ मानवच नाही तर संपूर्ण जीव जगत्व भौतिक जगत्च्या सहअस्तित्वावर जोर देते. अहिंसेचा सिद्धांत हा जैन धर्माचा आत्मा असून तो मुख्य जैन तत्त्वांमध्ये वैज्ञानिक स्वरुपात समाविष्ट झाला आहे. कोणत्याही जिवंत प्राणी किंवा वस्तूशी हिंसा करू नये, आपले विचार, शब्द, कृतीने तिला दुखवू नये; हा अहिंसेचा अर्थ आहे. तार्किक विचार आणि अनुभवाच्या आधारे अहिंसेची संकल्पना विकसित झाली आहे. जैन धर्म हा करुणा, वैश्विक प्रेम आणि बंधुत्वाचा धर्म आहे, जो जगातील सर्व सजीवांच्या कल्याणाची इच्छा करतो.

'अहिंसा' ही संकल्पना 'जगा आणि जगू द्या' या तत्त्वावर आधारित आहे. ही संघर्षाचा त्याग करून जागतिक शांतता प्रस्थापित करण्याच्या बाजूने आहे. एक शस्त्र दुसऱ्यापेक्षा अधिक शक्तिशाली असू शकते परंतु त्याची अहिंसा व शांततेच्या मार्गाशी तुलना होत नाही. आगीने आग विझवता येत नाही,


DOI: 10.48175/IJARSCT-19900A
ISSN 2581-9429 IJARSCT

कपड्यांवरील रक्ताचे डाग रक्ताने साफ करता येत नाहीत. जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी शस्त्रांची शर्यत संपवावी लागेल आणि लोकांमध्ये अहिंसेच्या तत्त्वज्ञानावर विश्वास निर्माण करावा लागेल.

- अपरिग्रह-

वस्तूंबद्दलची आसक्ती पूर्णपणे सोडून देत स्वतःच्या आत्म्यावर मन एकाग्र करणे म्हणजे अपरिग्रह होय. ‘परिग्रह परिमाण अणुव्रत’ हे या दिशेने पहिले पाऊल आहे, जे प्रथम परिग्रहाकडे गृहस्तीची पावले थांबवते आणि ‘अपरिग्रह महाव्रत’ ही शेवटची पायरी आहे, ज्यामध्ये व्यक्ती स्वाधीन होते.

असे म्हटले जाते की ‘संग्रह करणे’ ही मानवाची नैसर्गिक प्रवृत्ती असून त्याला त्याचे कर्मही कारणीभूत असतात. हीप्रवृत्ती जेव्हा गरजेपेक्षा जास्त वाढते तेव्हा समाजात अशांतता निर्माण होते आणि टंचाईच्या भीषणतेला सामोरे जाणारे लोक हिंसक क्रांतीकडे झुकतात. हिंसा, खोटे बोलणे, चोरी आणि वाईट प्रकारची पापेही यातून घडताना दिसतात. भगवान महावीरांचे अपरिग्रह तत्वज्ञान या अर्थाने महान आहे की, त्यांनी जगाला एक अहिंसक, अपरिग्रह संस्कृती दिली ज्यामध्ये असे सांगितले होते की,“विचार, शब्द आणि कृती अहिंसक असावी आणि गरजेनुसारच साहित्य संग्रह करावा. कोणाच्या दबावाविना अतिरिक्त साहित्याचा स्वेच्छेने त्याग करावा.”

जो स्वत: सजीव-निर्जीव वस्तू संग्रहित करतो आणि इतरांनाही ते करायला लावतो किंवा दुसऱ्याला तशी परवानगी देतो तो दु:खापासून मुक्त होत नाही. धन लालसा (परिग्रह) वाईट कर्मांना जन्म देते. पैसा या जगात किंवा परलोकात शरण देत नाही. ज्याप्रमाणे अंधारात दिवा विझला की दिसणारा मार्गही अदृश्य होतो, त्याचप्रमाणे भौतिक वस्तूंच्या (संपत्ती इ.) अंधारात न्यायाचा मार्ग दिसणे अशक्य होते. या परिस्थितीतून सुटण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे अपरिग्रह. हा अपरिग्रह हे जैन धर्म-तत्त्वज्ञानाचे मूलभूत वैशिष्ट्य आहे.

- सापेक्षता -

महावीरांचे अजून एक महत्वाचे तत्व होते ते म्हणजे सापेक्षता. सापेक्षता म्हणजे सर्वांना समान संधी. कोणी मोठा नसतो आणि कोणी लहान नसतो. लहान-मोठा होणे सापेक्ष आहे. एक व्यक्ती काही अपेक्षांच्या तुलनेत लहान असू शकते किंवा काही अपेक्षांच्या तुलनेत मोठीही असू शकते. जिथे सापेक्षतेची वृत्ती असते तिथे विकास होतो. घुसळण करताना एक हात मागे जातो आणि दुसरा पुढे येतो, नंतर पुढचा मागे जातो आणि मागचा पुढे येतो. अशा प्रकारे मंथन केल्यावर नवनीत (लोणी) बाहेर येते. चालताना एक पाय पुढे आणि दुसरा पाय मागे राहतो. मग पुढचा मागे आणि मागचा पुढे येतो. या क्रमानेच हालचाल होते. दोन्हीही एकत्र चालण्याचा प्रयत्न केल्यास हालचाल होऊ शकत नाही. ही सापेक्षताच स्याद्वादाचे रहस्य आहे, यातूनच सत्याचे ज्ञान आणि त्याचे निरूपण होते. सापेक्षता हे तत्व लोकशाहीचा कणा आहे. काही लोक सत्ता, अधिकार पदाला चिकटून राहिले आणि इतरांना संधी दिली नाही तर असंतोषाची ठिणगी पेटते. हे सापेक्ष धोरण दुफळी कमी करण्यासाठी फायद्याचे ठरते. धोरणे भिन्न असताना सापेक्षता असेल तर अनिष्टता निर्माण होत नाही. समाजाला तुकड्या-तुकड्यांमध्ये पाहता येते. कुणी व्यक्तीला सर्वस्व मानतो तर कुणी समाजाला, कुणी एका राष्ट्राच्या हिताला प्राधान्य देतो, तर कुणी दुसऱ्या राष्ट्राच्या हिताला, परिणामी कटुता निर्माण होते. त्यामुळे संघर्षाच्या जाणिवेतील बदल सापेक्षतेच्या विकासातूनच शक्य आहे.

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

Impact Factor: 7.53

Volume 4, Issue 2, October 2024

**निष्कर्ष -**

वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, जैन धर्म हा प्राचीन धर्म असूनही लोकशाहीसारख्या आधुनिक मूल्यांचा अंतर्भावकरतो. भगवान महावीरांच्या तत्वांचा व्यावहारिक प्रयोग आपणास लोकशाही प्रणालीत आढळतो. जैन तत्त्वज्ञानात आपल्याला पर्यावरण संरक्षण, स्त्रीवाद आणि उत्तर-आधुनिकता या घटकांची बीजेही दिसतात.समानता, स्वातंत्र्य, सहअस्तित्व, सापेक्षता इ. फलिते लोकशाहीची मूलभूत तत्त्वे आहेत.त्यामुळे आजही जैन धर्माच्या तत्त्वांमध्ये लोकशाहीला दिशा देण्याची आणि निरोगी समाजाची निर्मिती करण्याची क्षमता आहे.

परंतु सोबत ही बाब महत्त्वपूर्ण आहे की, लोकशाहीची लक्षणे प्रथमदर्शनी निदर्शनास आल्यावर आपणास समाधान मानून चालणार नाही. भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये कदाचित लोकशाहीचे बाह्य संस्थात्मक प्रारूप अस्तित्वात आलेले दिसून येईल; परंतु ती अंतर्गत क्षेत्रात विकृतअसू शकेल. उदाहरणार्थ,येथे राजकीय सत्तेसाठी अनेक राजकीय पक्षांमध्ये स्पर्धा असल्याचे दिसेल परंतु वास्तवात ही स्पर्धा पक्षांतील मूठभर प्रभावशाली आणि प्रस्थापित वर्गांमध्येच आढळेल.अर्थात फक्त लोकशाहीचे बाह्य प्रारूप वास्तविक लोकशाही अस्तित्वात येण्यासाठी पर्याप्त नाही. याबरोबरच हे पाहणे सुद्धा गरजेचे आहे की, यांमध्ये लोकांनाआत्मविकासाच्या (Self-Development) पुरेशा संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत. वास्तविक लोकशाही ती आहे, ज्यामध्ये निर्धन व सर्वहारा वर्गांच्या उत्कर्षाच्या शक्यता अधिकाधिक उज्ज्वल असतील.

**संदर्भ –**


1. JainKailashChand, (1974),*"Lord Mahavira and His times",*Motilal Banarsidass, Delhi.
2. ऋजुप्रज्ञा समणी, (2017),*"जैन संस्कृति और जीवन मूल्य",* स्नातकोत्तर पूर्वार्ध हिंदी, जैन विश्वभारती संस्थान, राजस्थान.
3. गाबा ओ. पी. & जाधव तुकाराम, (2012),*"ॲन इंट्रडक्शन टू पोलिटिकल थिअरी राजनीतिशास्त्र परिचय",* के'सागर पब्लिकेशन्स.
4. निगम शोभा, (2008),*"भारतीय दर्शन",* मोतीलाल बनारसीदास प्रकाशन वाराणसी.
5. भास्कर भागचंद जैन, (2006),*"जैन साहित्य और संस्कृति",* जैन संस्कृती संरक्षक संघ, सोलापूर.
6. वर्णी जिनेन्द्र, (2003),*"जैनेन्द्र सिद्धांत कोश, भाग 1 ते 4,"*भारतीय ज्ञानपीठ, दिल्ली.
7. शर्मा आर. एस. & फडके वासंती, (2013),*"एन्शंट इंडिया",* के'सागर पब्लिकेशन्स.
8. शास्त्री नेमिचन्द्र,(1968),*"आदिपुराण में प्रतिपादित भारत",*श्री गणेशप्रसाद वर्णी ग्रंथमाला वाराणसी.